महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण - २००१.
राज्य क्रीडा विकास समितीची स्थापना...

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :राक्रीधो-२००३/प्र.क्र. ११/क्रीयुसे-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ मार्च, २००३.

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २००१ अंतर्गत खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता त्याचबरोबर ग्राम पातळीपासून विभागीय स्तरापर्यंत क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देणे व या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा संकुल, विभागीय स्तरावर विभागीय क्रीडा संकुल अशा अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देणे व या करीता आकृतीबध्द कार्यक्रम आखणे व नियोजनात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राचे खेळाडू आशियाई व जागतिक स्तरावर चमकण्याच्या दृष्टीने योग्य त्या क्रीडा सुविधा विविध ठिकाणी उपलब्ध करुन देण्याकरीता <u>महाराष्ट्र स्पोर्टस् इनफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन</u> अंतर्गत योजनाबध्द क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरीता तसेच प्रचलित योजनांमध्ये सुधारणा करणे, क्रीडा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याकरीता समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत प्रचलित योजनांमध्ये योग्य त्या सुधारणा करणे, नविन धोरणा अंतर्गत अभिप्रेत असलेल्या योजनांना मान्यता देणे, विभागाच्या क्रीडा सुविधा हाती घेणे तसेच क्रीडा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याकरीता पुढील प्रदत्त राज्य स्तरीय क्रीडा विकास समिती स्थापन करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे .-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.मंत्री, क्रीडा | -- | अध्यक्ष |
| २. | मा. मंत्री, महसूल | -- | सदस्य |
| ३. | मा.मंत्री, वित्त | -- | सदस्य |
| ४. | मा.मंत्री, सा.बां.विभाग | -- | सदस्य |
| ५. | मा.राज्यमंत्री, क्रीडा | -- | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव, वित्त विभाग | -- | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव,नियोजन विभाग | -- | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव, क्रीडा | -- | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव, नगरविकास विभाग | -- | सदस्य |
| १०. | प्रधान सचिव, महसूल | -- | सदस्य |
| ११. | संचालक,क्रीडा व युवक सेवा, म.रा.पुणे | -- | सदस्य सचिव |

(आवश्यकते नुसार क्रीडा क्षेत्रातील तज्ञ व क्रीडा संस्थांचे प्रतिनिधी यांना आमंत्रित करता येईल)

## समितीची कार्यकक्षा :-

१. महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २००१ च्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

२. महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन तयार करणे. या अंतर्गत सर्वेक्षण अहवाल तयार करण्याकरिता संस्थेची (Agency) नेमणूक करणे.

३. धोरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे तयार करणे.

४. राज्यामध्ये विविध क्रीडा सुविधा निर्माण करणे व त्याचे नियोजन व संनियंत्रण करणे.

५. तालुका क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल व विभागीय क्रीडा संकुल त्याच प्रमाणे प्रादेशिक क्रीडा केंद्र उभारण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे.

६. प्रकल्पाकरीता निधी उपलब्ध करुन देणे त्याच बरोबर शासकीय जमिन उपलब्ध करुन देणे.

७. प्रचलित योजनांमध्ये बदल करणे.

८. राज्यातील क्रीडा प्रस्ताव अर्थसहाय्य करा, बांधा - हस्तांतर करा, बांधा-वापरा-हस्तांतर करा, बांधा व अन्य खाजगी गुंतवणुकींव्दारा प्रकल्प तयार करण्यास चालना देणे.

९. संपूर्ण क्रीडा योजनेचे संनियंत्रण करणे.

## समितीचे अधिकार :-

१. महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २००१ च्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयास मान्यता देणे.

२. महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्याकरीता आवश्यक ती उपाय योजना करण्यास त्या अंतर्गत सर्वेक्षण अहवाल तयार करण्याकरिता येणा-या खर्चास मंजूरी देणे त्याचप्रमाणे या संपूर्ण प्रस्तावास (Plan) मंजूरी देणे.

३. राज्यातधील विविध क्रीडा सुविधांसाठी येणा-या खर्चास मंजूरी देणे त्याचप्रमाणे या प्रस्तावांना तांत्रिक, प्रशासकीय व वित्तिय मंजूरी देणे.

४. तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुले त्याचप्रमाणे प्रादेशिक क्रीडा केंद्र उभारण्यास तांत्रिक, प्रशासकीय व वित्तिय अधिकार या समितीस असतील.

५. क्रीडा विकास प्रकल्पांकरीता शासकीय जमिन उपलब्ध करुन मंजूरी देण्याचे अधिकार या समितीस असतील. त्याचप्रमाणे प्रचलित योजनेमध्ये बदल करणे, खाजगी गुंतवणुकीदारांव्दारे तयार करण्यात आलेल्या क्रीडा प्रस्तावास तसेच वर नमूद केलेल्या संकुलांना तांत्रिक, प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याचे अधिकार या समितीस असतील.

महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन तयार करुन याव्दारे राज्यामध्ये क्रीडा सुविधांचे जाळे निर्माण करण्यासाठी क्रीडा विकास सुविधांचा कृती आराखडा तयार करणे व राज्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्याच्या दृष्टीने योग्य ते क्रीडा सुविधांचे नियोजन करणे याकरिता सल्लागारांची स्पर्धात्मकरित्या अर्ज मागवून नेमणूक करण्याकरीता राज्य क्रीडा विकास निधीस सल्लागार संस्थेची नेमणूक व अन्य खर्चासाठी रु. ५०.०० लाख एवढा खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदरचा खर्च " २२०४- क्रीडा व युवकसेवा -१०४ - क्रीडा व खेळ, पंचवार्षिक योजनांतर्गत

योजना राज्य योजनांतर्गत योजना (१६) (०२) क्रीडा संकुलाची स्थापना (२२०४ [illegible] ३) योजनांतर्गत, ४१ सहाय्यक अनुदान मागणी क्रमांक एन-२ " या योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

या समितीस नियोजन व वित्त विभागाचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील. या समितीची बैठक किमान २ महिन्यातून एकदा आयोजीत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचेकडील अनौपचारिक संदर्भ क्रमांक : ३०२/०३/व्यय-१४ दिनांक २६/३/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्रदिप सं. इंदुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व संबंधित,
मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय,
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती
उपसचिव, महसूल व वन विभाग/नियोजन विभाग/वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/ नगरविकास विभाग, मंत्रालय
मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
मा.प्रधान सचिव (क्रीडा) यांचे स्वीय सहायक
निवड नस्ती (क्रीयसे-१)